# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 02.10.2026** **वार : शुक्रवार**

---

## ठळक बातम्या

1. प्रशासकीय सेवेत भरती होणारे तरुण विकसित भारताचं स्वप्न साकार करतील; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.
2. राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आज देशभर सर्वत्र विविध कार्यक्रमाचं आयोजन.
3. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत देण्याचा महाराष्ट्र सरकारचा प्रयत्न, कर्जवसुलीला स्थगिती.
4. दिवेआगर समुद्रात 8 विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू.
5. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंची चमकदार कामगिरी.

## सविस्तर बातम्या

**पंतप्रधान मोदी-UPSC**

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत प्रशासकीय सेवेत भरती होणारे तरुण विकसित भारताच्या उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात यु. पी. एस. सी. संस्थेचा शताब्दीपूर्ती सोहळा काल नवी दिल्लीतील भारत मंडपममध्ये झाला; त्यावेळी पंतप्रधान बोलत होते. या सोहोळ्यात '100 ऐतिहासिक निर्णय' या पुस्तकांचं प्रकाशन तसंच एका नाण्याचं आणि एका विशेष टपाल तिकीटाचं अनावरण पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आलं. 'विकसित भारता'चं उद्दिष्ट गाठण्यासाठी ज्या पद्धतीचं प्रशासन आवश्यक आहे त्याचा मुख्य आधारस्तंभ ही संस्था असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले.

**अभिवादन**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची आज जयंती आहे त्यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दिल्लीतल्या राजघाट इथं महात्मा गांधी यांच्या स्मृतिस्थळी पुष्पांजली अर्पण करून गांधीजींना अभिवादन केलं. पंतप्रधान मोदी यांनी माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या विजयघाट या स्मृतिस्थळी जाऊन त्यांना अभिवादन केलं.

**गुजरात गांधी**

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त गुजराथमधील त्यांचे जन्मस्थान असलेल्या पोरबंदरमध्ये कीर्ती मंदिर इथं 'प्रार्थना सभे'चं आयोजन करण्यात आलं असून, गुजरातचे मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल सभेला उपस्थित राहाणार आहेत. साबरमती आश्रमताही सर्वधर्म प्रार्थना सभेचंही आयोजन करण्यात आलं आहे.

**ग्रामसभा**

गांधी जयंतीच्या निमित्ताने देशभरात आज विशेष ग्रामसभा आयोजित केल्या जाणार आहेत. या सभांमध्ये प्रशासनातील परिवर्तनकारी सुधारणा आणि उपक्रमांवर चर्चा होणार आहे. या विशेष सभांमधून 'पीपल्स प्लॅन कॅम्पेन' 2026-27 म्हणजेच 'सबकी योजना, सबका विकास' या मोहिमेचा शुभारंभही केला जाईल असं ग्रामीण विकास मंत्रालयानं म्हटलं आहे.

**फुले-विशेषनाणे**

थोर समाज सुधारक महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त विशेष स्मृती नाणे आणि टपाल तिकीट जारी करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य शासनानं घेतला आहे. यासाठी 55 लाख रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून या निर्णयाची अंमलबजावणी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत केली जाणार आहे.

**कॅप्टन स्मिथ-कौतुक**

फ्लाय दुबई विमानाचे वैमानिक कॅप्टन स्मित मच्छार यांनी स्वतःवर प्राणघातक हल्ला झाल्यानंतरही, प्रसंगावधान राखत विमानातील 180 प्रवाशांचे प्राण वाचवले. त्यांच्या या धाडसी कार्यसाठी त्यांच्यावर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती आणि पंतप्रधानांनसह विविध देशांच्या नेत्यांनीही स्मिथचं कौतुक केलं आहे. स्मित यांच्या प्रकृतीवर बारकाईनं लक्ष ठेवण्यात येत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. संयुक्त अरब अमिरातीमधल्या भारतीय राजदूतांनी रुग्णालयात कॅप्टन मच्छार यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्याआधी राजदूतांनी त्यांच्या कुटुंबीयांचीही भेट घेतली आणि कॅप्टन स्मित यांच्या प्रकृतीसाठी सर्वतोपरी मदतीचं आश्वासन दिलं. त्यांना पुढील वैद्यकीय उपचारांसाठी अबू धाबी इथं हलवण्यात आलं आहे.

**बावनकुळे-पत्रक**

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीचे निकष लागू न झालेल्या मात्र, दुष्काळसदृश परिस्थिती असलेल्या 15 ते 18 तालुके पंचनामे आणि आणेवारीच्या आधारे दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या कक्षेत आणण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे असं राज्याचे महसूल मंत्री आणि दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. ते काल मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. पंचनामे लवकर पूर्ण करून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत देण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**पीककर्ज-पुनर्गठन**

यावर्षीच्या खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थिती घोषित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्यातील 265 तालुक्यांतील शेतकऱ्यांनी खरीप हंगामात घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जात पुनर्गठन करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली असून, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीलाही स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी काल मुंबईत दिली.

**साखर साठवणी केंद्र**

साठेबाजी आणि इतर गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारनं व्यापाऱ्यांसाठी साखर साठवण्याचा कालावधी 15 दिवसांपर्यंत कमी केला असून, त्याची मर्यादा एक हजार क्विंटल निश्चित केली आहे. हा निर्णय 15 सप्टेंबरपासून लागू झाला असून, नोव्हेंबर 2026 अखेरपर्यंत लागू राहणार आहे.

**मोदी-पुतीन**

युक्रेन संघर्षावर परस्पर संमतीनं तोडगा काढण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे चांगल्या कल्पना आहेत, असं रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांनी म्हटलं आहे. वाल्दाई फोरम् मध्ये बोलताना मोदी यांच्याशी चर्चा करताना शांततापूर्ण तोडगा काढण्यात विशेष रस दाखवत असल्याचंही त्यांनी सांगितलं. या संदर्भात राजकीय भूमिका तटस्थ असली तरीही शत्रुत्व संपवण्यासाठी भारत सक्रीय प्रयत्न करत असल्याचंही पुतीन म्हणाले.

**भारत-कॅनडा व्यापार**

ऊर्जा, महत्त्वपूर्ण खनिजं आणि एरोस्पेस या क्षेत्रांमध्ये अधिक सहकार्याच्या माध्यमातून भारताच्या आर्थिक विकासाला पाठिंबा देण्याची कॅनडाची इच्छा आहे, असं मत कॅनडाचे आंतरराष्ट्रीय व्यापार मंत्री मनिंदर सिद्धू यांनी म्हटलं आहे. ते काल मिलवॉकी इथं झालेल्या G-20 देशांच्या व्यापार मंत्र्यांच्या बैठकीत बोलत होते. भारत आणि कॅनडाचे पुढील पाच वर्षांतला द्विपक्षीय व्यापार 30 अब्ज डॉलर्सवरून जवळपास 70 अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट आहे,असंही सिद्धू यांनी सांगितलं.सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करारासाठीची वाटाघाटींची पाचवी फेरी येत्या सोमवारी ओटावा इथं सुरू होणार असून येत्या काही महिन्यांत ही चर्चा पूर्ण करण्याचा दोन्ही पक्षांचा मानस आहे, असंही ते म्हणाले.

**पियुष गोयल**

अमेरिकेतील विस्कॉन्सिनमधील मिलवॉकी इथं झालेल्या जी-वीस देशांच्या व्यापार मंत्र्यांच्या बैठकीत केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी भारताच्या अन्नसुरक्षा उपाययोजनांवर प्रकाश टाकला. सर्वांसाठी अन्नसुरक्षा सुनिश्चित करणं आणि शेतकऱ्यांसाठी अधिक संधी निर्माण करणे हे भारताच्या धोरणाच्या केंद्रस्थानी आहे,असं सांगत कोणत्याही देशावर दबाव आणण्यासाठी अन्नाचा वापर कधीही साधन म्हणून केला जाऊ नये,असंही गोयल यांनी सांगितलं. या बैठकीच्या निमित्तानं गोयल यांनी ब्रिटन आणि ऑस्ट्रेलियाच्या व्यापार मंत्र्यांशी चर्चा करून आर्थिक आणि व्यापार कराराच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.

**वर्धापन दिन**

आकाशवाणी पुणे केंद्राचा आज 73 वा वर्धापन दिन आहे. 2 ऑक्टोबर 1953 रोजी स्थापन झालेल्या या केंद्रानं बातम्यांसह विविध सांस्कृतिक कार्यक्रम, विशेष मान्यवरांच्या मुलाखती, संगीत नाटक इत्यादी माध्यमातून श्रोत्यांवर अमीट ठसा उमटवला आहे.

**विद्यार्थी मृत्यू**

महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील दिवेआगरच्या समुद्रात काल 8 विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला. हे विद्यार्थी पुणे जिल्ह्यातील आळंदीतल्या शिकवणी वर्गातील होते, ते दिवेआगरला सहलीसाठी गेले होते. समुद्रात पोहण्यासाठी उतरलेल्या विद्यार्थ्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. या दुर्घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याचे निर्देश आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिले आहेत.

**आशियाई स्पर्धा**

आशियाई क्रीडा स्पर्धेत आज तिरंदाजीमध्ये रिकर्व प्रकारात भारतीय महिला संघाने सुवर्ण पदकाला गवसणी घातली आहे. अंकिता भकत, कुमकुम आणि कीर्ती या संघाने ही कामगिरी केली आहे. अंतिम फेरीत दक्षिण कोरियाच्या संघाला धूळ चारली.

दरम्यान काल पुरूष हॉकी आणि क्रिकेट संघांनी आपल्या प्रतिस्पर्धी संघाना मात देत अंतिम फेरीत प्रवेश केला. पुरुष हॉकी संघानं अटीतटीच्या सामन्यात पाकिस्तानचा 4-3 असा पराभव केला तर क्रिकेट संघानं श्रीलंकेला 124 धावांनी पराभूत करत अंतिम फेरी गाठली. ग्रेको रोम कुस्तीपटू नितेश सिवाचने काल पुरुषांच्या 97 किलो वजनी गटात रौप्य पदक पटकावले. तर नौकायन स्पर्धेत पुरुषांच्या स्किफ गटात मनू फ्रान्सिस आणि प्रिन्स कुरिसिंकल नोबेल या भारतीय जोडीला रौप्य पदक मिळाले. तर महिलांच्या स्किफ नौकायन प्रकारात हर्षिता तोमर आणि शीतल वर्मा यांच्या जोडीला कास्य पदक मिळाले. गणेश मणी रत्नम तिरुमरु याला तिरंदाजीमध्ये वैयक्तिक कपाउंड प्रकारात कास्य पदक मिळाले. पुरुष आणि महिला स्क्वॅश प्रकारात दोन्ही संघांना उपांत्य फेरीत पराभवाला सामोरे जावे लागल्याने त्यांना कास्य पदकावर समाधान मानावे लागले. भारताच्या पदकांची संख्या 67 वर पोहोचली आहे; यात 11 सुवर्ण, 23 रौप्य आणि 33 कास्य पदकांचा समावेश आहे.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदकविजेत्या कामगिरीबद्दल भारतीय खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

**<u>हवामान</u>**

हवामान विभागानं आज अरुणाचल प्रदेशच्या काही भागांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तसंच केरळ,माहे,लक्षद्वीप, तामिळनाडू, पुदुचेरी आणि कराईकलच्या काही भागांमध्ये मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.